# पोलीस आयुक्तालय नवी मुंबई

## प्रेसनोट

**२०२२**

गुन्हे शाखा, नवीमुंबई

दिनांक १८.०४.२०२२

२५८ ग्रॅम वजनाचा 'मेथॅक्युलोन' अंमली पदार्थ व इतर मुद्देमाल असा एकूण २६ए०४ए५००/- रु किमतीचा मुद्देमाल जप्त गून्हे शाखा, मध्यवर्ती कक्ष नवी मूंबई यांची कामगिरी

'मेथॅक्युलोन' अंमली पदार्थ विक्री करण्याकरीता आलेल्या दोन नायजेरियन नागरिकांना पोलीसांनी केली अटक

---

- नवी मुंबई परिसरात 'नशा मुक्ती अभियान अंतर्गत' विशेष मोहिम राबविणेबाबत मा. पोलीस आयुक्त श्री बिपीन कुमार सिंग, यांनी आदेशित केले होते. त्या अनुषंगाने मा. सह पोलीस आयुक्त डॉ. श्री. जय जाधव , मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. महेश घुर्ये, गुन्हे शाखेचे मा. पोलीस उप आयुक्त श्री. सुरेश मेंगडे यांनी नवी मुंबई परिसरातील अंमली पदार्थ विक्री करणाऱ्या इसमांचा शोध घेवुन कारवाई करणेबाबत सुचना दिलेल्या होत्या.

- मा. सहाय्यक पोलीस आयुक्त श्री विनायक वस्त यांचे मार्गदर्शनाखाली मध्यवर्ती कक्ष, गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, विजयसिंह भोसले व पथक अंमली पदार्थ विरोधी कारवाई करणेकामी नेमण्यात आलेले होते. मध्यवर्ती कक्षास मिळालेल्या गोपनिय माहीतीवरुन दि. १४/०४/२०२२ रोजी ए.पी.एम.सी. पोलीस ठाणे हद्दीतील पामबीच मॉल समोर कौशल्यपुर्ण व वेशांतर सापळा रचुन खालील नमुद इसमांना अटक केली व त्यांचेकडून खालील नमुद मुद्देमाल हस्तगत केलेला आहे. सदरबाबत ए.पी.एम.सी. पोलीस ठाण्यात गुन्हा रजि. क्र. १३५/२०२२ एन.डी.पी.एस. अॅक्ट कलम ८(क), २२(ब), २९ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असुन मध्यवर्ती कक्षाकडुन पुढील अधिक तपास चालु आहे.

- **अटक आरोपींची नावे** :-

  १) निझकुसी चिनांसो ऑगस्टीन उर्फ नोनसो डॅनियल नझे वय ३१ वर्षे, **नागरिकतत्व - नायजेरियन,**

  २) निझकुसी ऐकेने ऑगस्टीन उर्फ निझकुसी ऐकेने फ्रॅक, वय २८ वर्षे, **नागरिकतत्व - नायजेरियन,**

  दोन्ही सध्या रा. रुम नं. १०३, प्लॉट नं. ९०, आनमुरे रेसिडन्स, से.क्र. १८, उलवे, नवी मुंबई

- **हस्तगत मालमत्ता** :-

  १) २५,८०,०००/- रु किंमतीचा २५८ ग्रॅम वजनाचा '' मेथॅक्युलोन '' हा अंमली पदार्थ,

  २) २४,५००/- रु किंमतीचे तीन मोबाईल व रोख रक्कम

---------------

**२६,०४,५००/- रु किंमतीचा एकुण मुद्देमाल**

- **आरोपीची गुन्हेगारी पार्श्वभुमी**
  **आरोपी क्र. १ याचेवर यापुर्वी**
  १) आझादमैदान पोलीस ठाणे, मुंबई गु.र.क्र. २०/२०१७ एन.डी.पी.एस. ॲक्ट कलम ८(क),२१(क)२२(क) अन्वये गुन्हा दाखल आहे.

सदरची कारवाई मा. पोलीस आयुक्त श्री बिपीन कुमार सिंग, मा. सह पोलीस आयुक्त डॉ. श्री. जय जाधव , मा. अपर पोलीस आयुक्त गुन्हे श्री महेश घुर्ये, गुन्हे शाखेचे मा. पोलीस उप आयुक्त श्री सुरेश मेंगडे व मा. सहाय्यक पोलीस आयुक्त श्री विनायक वस्त यांचे मार्गदर्शनाखाली -

मध्यवर्ती कक्ष, गुन्हे शाखेचे वपोनि विजयसिंह भोसले, वपोनि सय्यद (अं.प.वि.प.), सहा. पोलीस निरीक्षक गंगाधर देवडे, अलका पाटील, शशिकांत पवार, पोउपनि. संजय रेड्डी, व पोलीस अंमलदार - सतिश सरफरे, शशिकांत शेंडगे, आतिष कदम, प्रकाश साळुंखे, सतिष चव्हाण, अजय कदम, संतोष गायकवाड यांनी केलेली आहे.

-----ooo-----